महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्‌या परिषद)
इयत्ता : चौथी

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**चिठ्‌ठी**

११.१२.१५

प्रिय सोनाली,

काल माझा वाढदिवस असल्यामुळे मी क्लासला आले नव्हते. गणिताच्या सरांनी कोणता अभ्यास दिला आहे ते मला मधल्या सुट्टीत प्लीज सांग. संध्याकाळी क्लासला येताना अभ्यास करून आले नाही तर सर रागवतील.

तुझी मैत्रीण,

सुजाता

**प्रश्न :-**

१) चिठ्‌ठी कुणी कुणाला लिहिली आहे?
२) सुजाता क्लासला का गेली नव्हती?
३) सुजाताने चिठ्‌ठी का लिहिली?
४) सुजाताची शाळा कोणत्या सत्रात भरते

---

**गोष्ट**

लेखिका:- चित्रा नाईक

आजोबा म्हणाले, “तू फारच उपयुक्त माहिती आणलीस, टिंकू! चला, तू म्हणतेस ती जागा पाहू. चांगली असली तर तिथेच नवीन घर करू.”
आजोबा, चिंकू, टिंकू, आणि मिंकू घरी परत गेले. बाबाउंदीर आणि आईउंदीर त्यांची वाट पाहत होते. आईला पाहून मिंकू पुढे धावला. तिला बिलगून तो ओरडला, “आई, आई ग, आपण नवीन घरात रहायला जायचं. आम्ही ठरवलंय नवीन घर.”

**प्रश्न :-**

१) नव्या घराच्या जागेची माहिती कुणी आणली?

२) नवीन घरात कोण रहायला जाणार आहेत?

अ) मिंकू आणि आई  ब) टिंकू आणि आजोबा  क) घरातले सर्वजण

३) मिंकू आईला बिलगून का ओरडला असेल?

अ) जुने घर सोडायला लागणार म्हणून  ब) नव्या घरात रहायला जायला लागणार म्हणून  क) त्याला भीती वाटली म्हणून

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : चौथी

---

**कविता**

संदर्भ :- निवडक किशोर

कवयित्री :- **लीला पाटील**

## हिरवा कोकण

पसरलाय सागर
दूरवर पहा
फुललाय निसर्ग
न्याहळत रहा -

अबोली वस्त्रांचे
डोंगर छान
माडांचं सळसळनं
तृप्त कान -

सोन - नागचाफा
कवठीचाफा अस्सा
सुरंगीचा गंध
दरवळतो खासा -

चिंचोळे रस्ते
तांबडी माती
चीऱ्यांची घरे
टुमदार किती -

हिरवं स्वच्छ
सारवलं अंगण
शोभे छान
तुळशी वृंदावन -

आहे परसात
नेटकी विहीर
माड, आंबा
आलाय बहर -

हिरवा कोकण
सहल न्यारी
आमचं काश्मीर
पहा तरी -

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : चौथी

---------------------------------------------------------------------------------------------------

**प्रश्न :-**

१) कोकण कसे आहे हे सांगणारे शब्द लिही.

-------------------- रस्ते

-------------------- माती

-------------------- घरे

-------------------- अंगण

२) कवितेत आल्येल्या पाच झाडांची नावे लिही.

३) कोकणातल्या घराघरातल्या अंगणात काय दिसत आहे ?

४) विहीर कुठे आहे असे कवितेत म्हटले आहे ?

५) डोंगरांनी अबोली वस्त्र घातले आहे असे कवीला का वाटले आहे ?

६) कोकणाला ‘आमचं काश्मीर’ असे का म्हटले आहे ?

७) तुमच्या परिसराचे वर्णन करणारे शब्द घालून कडवे तयार कर.

पसरलाय ----------------
दूरवर पहा
-------------  निसर्ग
न्याहळत रहा.

८) तुमच्या परिसरातील झाडांची नावे लिहून कडवे पूर्ण कर.

--------- --------
--------- ------ अस्सा
--------- -------- गंध
दरवळतो खासा.

-------------- रस्ते
-------------- माती
-------------- घरे
-------------- किती ?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : चौथी

---

**संदर्भ :-** चाफा

**कवी -** कुसुमाग्रज

**पोबारा**

वाहता वाहता म्हणाला वारा

आगीनगाडीत बसेन जरा

धावत पळतो थांबणे नाही

गाडीत विसावा मिळेल काही

चालत्या रेल्वेच्या गाडीत घुसे

पहिल्या वर्गात डौलात बसे

खिडकीमधून बाहेर बघत

डोंगरदऱ्यांची रानांची गंमत

तोच ये समोर तपासनीस

करतो वाऱ्याची विचारपूस

म्हणाला, ‘कोणत्या जायचे गावा ?

साहेब आपुले तिकीट दावा !’

‘तिकीट तिकीट ?’ गांगरे वारा

खिडकीमधून करी पोबारा !

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : चौथी

---

**नवीन शब्द :-** विसावा - विश्रांती गांगरने - गोंधळने

पोबारा - धूम ठोकणे, पळून जाने विचारपूस - चौकशी करणे

तपासनीस - तपासणी करणारा दावा - दाखवा

डौलात - ऐटीत घुसणे - आत शिरणे

**प्रश्न :-**

१) आगीनगाडीत कोणाला बसायचे आहे ?

२) कोणत्या वर्गाच्या डब्यातून त्याने प्रवास केला ?

३) आगीनगाडीच्या खिडकीतून बाहेरचे काय दिसते?

४) वाऱ्याची विचारपूस कोणी केली?

५) तिकीट तिकीट? असे कवितेत कोणी म्हटले आहे?

६) आगीनगाडीसाठी कवितेत आणखी कोणता शब्द आला आहे?

७) आगीनगाडीत विश्रांती मिळेल असे वाऱ्याला का वाटले असेल?

८) वाऱ्याने खिडकीतून पोबारा का केला?

९) तपासनीस आणि वारा यांच्यातील (संवाद) बोलणे लिही.

१०) वाऱ्याला खिडकीतून दिसणाऱ्या दृश्याचे चित्र काढ.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : चौथी

---

**सूचनाफलक**

**औरंगाबाद पुरातत्व विभाग**

पर्यटकांनी खालील सूचनांचे पालन करावे

- लेणी हा आपला ठेवा आहे. त्यांना हात लावू नये.
- येथे छायचित्रे काढण्यास सक्त मनाई आहे.
- परिसरात कोठेही स्वतःचे नाव इत्यादी लिहू वा कोरु नये.
- खाद्यपदार्थ खाऊन परिसरात अस्वच्छता करू नये.
- शांतता राखावी.
- धूम्रपान करू नये.

**नवीन शब्द** :- पुरातत्व - प्राचीन ऐतिहासिक ठिकाणे नीट ठेवणारा विभाग

पर्यटक - प्रवासी

लेणी - डोंगरातील गुहेत केलेले कोरीवकाम

**प्रश्न** :-

१ लेणी म्हणजे काय?

२ लेण्यांची छायाचित्रे काढण्याविषयी काय नियम आहे?

३ पर्यटकांनी सूचना पाळल्या नाहीत तर काय करावे असे तुला वाटते?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : चौथी

---

**माहितीपर लेखन**

संदर्भ :- तेरा अपूर्व किशोर कथा

आजोबा गेली दहा वर्षे नदीत मासे धरायचे काम करीत होते. लहान चंदेरी चिलवा मासे, सुंदर मोठाले महसीर मासे व लांब मिशांचे शिंगाडा मासे कुठे पकडायचे ते त्यांना नेमकं ठाऊक होतं. पाणी कुठे खोल आहे व कुठे उथळ आहे, तसंच कोणतं आमिष गळाला लावायचं, कोणत्या माशांना किडे आवडतात व कोणत्या माशांना चणे आवडतात तेही त्यांना माहीत होतं. त्यांचा मुलगा शहरातील एका कारखान्यात नोकरी करायला निघून गेला होता. आजोबांना नातू नव्हता पण एक नात होती. तिचं नाव सीता. मुलांची सर्व कामं तिला येतं. फार काय ती कित्येक वेळा मुलांपेक्षा जास्त चांगलं काम करायची. आजीने तिला सर्व कामे शिकवली होती. पण आजोबा आजी कुणालाच लिहिता वाचता येत नव्हतं, परिणामी सीतालाही लिहिता वाचता येत नव्हतं.

**प्रश्न :-**

१) आजोबांचा व्यवसाय कोणता होता?
२) आजोबा कोणते मासे पकडायचे?
३) आजोबा निष्णात कोळी होते, हे आपल्याला ज्यावरून समजते अशा कोणत्याही दोन गोष्टी लिही.
४) सीताला लिहिता वाचता येत नाही हे वाचल्यावर तुला काय वाटलं?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : चौथी

---

**पाककृती**

कडधान्यांची कोशिंबीर

साहित्य – एक एक चमचा मूग, हरभरे, मटकी, एक कांदा, एक टोमॅटो, एक चमचा लिंबाचा रस, मीठ, चाट मसाला, कोथिंबीर कृती – सर्व कडधान्य ५ ते ६ तास भिजत घाला. त्यातले पाणी गाळून सुती कापडात ८ ते १० तास बांधून ठेवा. त्यांना छान मोड आल्यानंतर आता त्याची कोशिंबीर तयार करायला घ्या. एका भांड्यात मोड आलेली सर्व कडधान्ये, बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो, कोथिंबीर हे सर्व घालून एकत्र करा. त्यात लिंबाचा रस, चवीनुसार मीठ व मसाला घालून मिसळून घ्या. आवडत असल्यास वरून बारीक शेव पेरा. मुलांना कडधान्याची उसळ खायला आवडत नसली तरी ही कोशिंबीर मात्र मुले आवडीने खातात.

**प्रश्न :-**

१) कोशिंबिरीसाठी कोणती कडधान्ये वापरायची आहेत ?
२) कडधान्यांना मोड कसे आणतात?
३) या कडधान्यांऐवजी तुला आणखी कोणत्या पदार्थांचा वापर करता येईल ?
४) या कोशिंबीरीसाठी मोड आलेली कडधान्ये का वापरली असतील ?
५) तुला कडधान्यांची उसळ खायला आवडेल की कोशिंबीर? का?